महाराष्ट्र राज्यातील वक्फ मालमत्तांच्या गाव नमुना नं.७/१२ च्या उताऱ्यावर तसेच नागरी भागातील वक्फ मिळकतींच्या अधिकार अभिलेखांमध्ये केवळ संबंधित वक्फ संस्थेच्या नावाची नोंद घेणे आणि इतर हक्क सदरी **"वक्फ प्रतिबंधित सत्ता प्रकार"** अशी नोंद घेण्याबाबत सर्वसमावेशक सूचना.

**महाराष्ट्र शासन**

**महसूल व वन विभाग**

**शासन निर्णय क्रमांकः वक्फ २०१५/प्र.क्र. ७८/ज-१ अ**

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,

मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.

**दिनांक: १३ एप्रिल, २०१६**

**वाचा -**

१) शासन अधिसूचना, महसूल व वन विभाग, क्र. संकीर्ण-१०/०७/प्र.क्र.१७५/ल-३, दि.९ ऑक्टोबर, २००७

२) शासन परिपत्रक महसूल व वन विभाग, क्र डीईव्ही-२०१०/प्र.क्र.९/ल-४, दि.३०.०७.२०१०

३) राज्य मंत्रिमंडळ बैठक दि. ९.४.२०१५ मधील निर्णय

४) प्रधान सचिव, अल्पसंख्यांक विकास विभाग यांचे अ.शा. पत्र क्र. वक्फ-२०१५/प्र.क्र.९९ / १/का-४, दि.९.४.२०१५

**प्रस्तावना -**

वक्फ अधिनियम, १९९५ हा केंद्रीय कायदा महाराष्ट्र राज्यात दि.१.१.१९९६ पासून लागू करण्यात आलेला आहे. सदर कायद्यातील कलम १०८-A मधील तरतुदींअन्वये सदर कायद्याला अधिभावी प्रभाव (Overriding effect) प्रदान करण्यात आलेला असून त्यानुसार या कायद्यातील तरतुदी व अन्य कोणत्याही कायद्यातील तरतुदी परस्पर विसंगत ठरत असल्यास, अशा प्रकरणी या कायद्याच्या तरतुदी प्रभावी ठरतात. वक्फ अधिनियम, १९९५ या केंद्रीय कायद्यातील कलम ५१ प्रमाणे वक्फ मंडळाच्या पुर्वानुमतीशिवाय कोणत्याही स्थावर वक्फ मालमत्तेचा भाडेपट्टा निष्प्रभ असेल. तसेच, कलम ५१(१-ए) अन्वये वक्फ मालमत्तेची कोणतीही विक्री, मालमत्ता उपहार म्हणून देणे, अदलाबदल करणे, गहाण ठेवणे, किंवा वक्फ मालमत्तेचे हस्तांतरण हे व्यवहार अवैध किंवा मुळातच निष्प्रभ असल्याची तरतूद आहे. वक्फ अधिनियम, १९९५ च्या कलम ५१ च्या तरतूदींचा भंग करुन वक्फ मालमत्तेचे अन्यसंक्रामण करण्यात आल्यास संबंधित वक्फ मालमत्ता पूर्ववत वक्फ मंडळाच्या ताब्यात देण्याच्या

विषयी आणि यासंदर्भात शिक्षेविषयीच्या तरतूदी वक्फ अधिनियम,१९९५ च्या कलम ५२ व ५२-ए मध्ये अंतर्भूत आहेत.

वक्फ अधिनियम,१९९५ च्या कलम ३(r) अन्वये **"वक्फ"** या शब्दाची व्याख्या करण्यात आलेली आहे. त्यानुसार सर्वसामान्यपणे **"वक्फ मालमत्ता"** या संज्ञेत मोडणाऱ्या मालमत्तांमध्ये प्रामुख्याने मशिदी, दर्गाह, कब्रस्तान, अनाथालय, इत्यादी संस्थांशी संलग्न वक्फ अधिनियम, १९९५ च्या कक्षेमध्ये येणाऱ्या स्थावर मालमत्ता व मशरुतुल-खिदमत इनाम अशा जमिनींचा समावेश होतो. सर्वसामान्यपणे अशा वक्फ मालमत्तांच्या देखरेखीसाठी मुतवल्ली किंवा व्यवस्थापन समितीची नियुक्ती करण्यास वक्फ अधिनियमातील तरतुदींनुसार वक्फ मंडळाकडून मान्यता दिली जाते. तथापि, वक्फ अधिनियम,१९९५ मध्ये वर नमूद तरतूदी असताना देखील काही ठिकाणी वक्फ मालमत्तेच्या मुतवल्ली/व्यवस्थापन समिती इ. यांनी बेकायदेशीरपणे वक्फ मालमत्तांची विक्री/ भाडेपट्टा संबंधीचे व्यवहार केल्याचे शासनाच्या निदर्शनास आले आहे.

शासन अधिसूचना, महसूल व वन विभाग, क्रमांक संकीर्ण-१०/०७/प्र.क्र.१७५/ल-३, दि.९ ऑक्टोबर, २००७ अन्वये महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, औरंगाबाद येथील कथित गैरप्रकारांची चौकशी करण्यासाठी श्री.ए.टी.ए.के.शेख, सेवानिवृत्त जिल्हा व सत्र न्यायाधीश, हा एक सदस्यीय चौकशी आयोग गठीत करण्यात आला होता. सदर चौकशी आयोगाने सादर केलेल्या अहवालात वरील बाबींवर सोदाहरण प्रकाश टाकण्यात आलेला आहे. त्याचप्रमाणे वक्फ मालमत्तेच्या गाव नमुना नं.७/१२ उताऱ्यामधील इतर हक्क सदरी **"प्रतिबंधित सत्ता प्रकार"** अशी नोंद करणे वक्फ अधिनियम, १९९५ तरतूदींचा विचार करता आवश्यक असताना काही महसुली अधिकारी वक्फ मालमत्तांच्या अधिकार अभिलेखात कब्जेदार रकान्यात खाजगी नावाची नोंद करतात, अशा आशयाचे निरीक्षण सदर आयोगाने नोंदविले आहे.

या पार्श्वभूमीवर, राज्य मंत्रिमंडळाच्या दिनांक ९.४.२०१५ रोजीच्या बैठकीत महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाकडे निहीत केलेल्या सर्व प्रकारच्या वक्फ मालमत्तांच्या संदर्भात गा.न.नं.७/१२ च्या उताऱ्यावर भोगवटादार सदरी फक्त संबंधित वक्फ संस्थेच्या नांवाची नोंद असावी व त्याशिवाय अन्य कोणाच्या नावांच्या नोंदी असू नयेत, त्याचप्रमाणे वक्फ मालमत्तांच्या इतर हक्काच्या रकान्यात देखील केवळ "प्रतिबंधित सत्ता प्रकार" अशी नोंद घेण्यात यावी. कोणत्याही परिस्थितीत मुतवल्लींचे वा इतर कोणत्याही खाजगी इसमांचे नाव नोंदविण्यात येऊ नयेत, अशी नावे आधीपासून अस्तित्वात असल्यास ती काढून टाकून केवळ संबंधित वक्फ संस्थेचे नाव वा "प्रतिबंधित सत्ताप्रकार" अशी नोंद घेण्यात यावी, असा निर्णय घेण्यात आला आहे. त्याअनुषंगाने याबाबत क्षेत्रीय महसूली यंत्रणा व प्राधिकारी यांना सर्वकष सूचना देण्यासाठी शासन निर्णय निर्गमित करण्याची विनंती अल्पसंख्यांक विकास विभागाकडून करण्यात आली होती. यासंदर्भात शासन पुढीलप्रमाणे निर्णय घेत आहे.

**शासन निर्णय -**

वक्फ अधिनियम, १९९५ च्या कलम ४० मधील तरतुदींनुसार एखादी मालमत्ता ही वक्फ मालमत्ता आहे किंवा कसे, तसेच ती शिया वक्फ मालमत्ता आहे वा सुन्नी वक्फ मालमत्ता, हे ठरविण्याचे अधिकार राज्य वक्फ मंडळाला आहेत. वक्फ अधिनियम, १९९५ मधील कलम ५१, ५१(१-ए), ५२ व ५२-ए मधील तरतूदी, श्री.ए.टी.ए.के.शेख यांच्या एक सदस्यीय चौकशी आयोगाने त्यांच्या अहवालात केलेल्या शिफारशी आणि राज्य मंत्रिमंडळाच्या दिनांक ९.४.२०१५ रोजीच्या बैठकीतील निर्णय विचारात घेऊन, महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ मधील तरतूदी व त्याखालील, महाराष्ट्र जमीन महसूल अधिकार अभिलेख आणि नोंदवह्या (तयार करणे व सुस्थितीत ठेवणे) नियम १९७१ मधील तरतूदीनुसार प्राप्त असलेल्या अधिकारात महाराष्ट्र राज्यातील वक्फ मालमत्तांच्या गाव नमुना नं.७/१२ च्या उताऱ्यावर तसेच नागरी भागातील वक्फ मिळकतींच्या अधिकार अभिलेखांमध्ये भोगवटादार व इतर हक्क सदरी घ्यावयाच्या नोंदींच्या संदर्भात क्षेत्रीय महसूली यंत्रणा व प्राधिकारी यांना खालीलप्रमाणे निर्देश देण्यात येत आहेत :-

(१) राज्यातील वक्फ मालमत्ता यामध्ये मशिदी, दर्गाह, कब्रस्तान, अनाथालय इ. संस्थांशी संलग्न वक्फ अधिनियम, १९९५ च्या कक्षेमध्ये येणाऱ्या स्थावर मालमत्ता व मशरुतुल-खिदमत इनाम अशा जमिनींचा समावेश आहे. या संदर्भात गाव नमुना नं.७/१२ च्या उताऱ्यावर यापुढे नोंद घेतांना भोगवटादार सदरी फक्त संबंधित **"वक्फ संस्थेचे नाव"** यांची नोंद घेण्यात यावी. त्याशिवाय अन्य कोणाच्याही नावांच्या नोंदी असू नयेत.

(२) त्याचप्रमाणे महाराष्ट्र राज्यातील वक्फ मालमत्तांच्या बाबतीत गा.न.नं. ७/१२ उताऱ्याच्या इतर हक्क सदरी **"वक्फ प्रतिबंधित सत्ता प्रकार"** अशी नोंद घेण्यात यावी.

(३) महाराष्ट्र राज्यातील वक्फ मालमत्तांच्या बाबतीत कोणत्याही परिस्थितीत मुतवल्लीचे वा इतर कोणत्याही खाजगी इसमांचे नाव अधिकार अभिलेखात नोंदविण्यात येऊ नयेत. अशी नावे आधीपासून अधिकार अभिलेखात अस्तित्वात असल्यास, ती महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६, आणि वक्फ अधिनियम, १९९५ व संबंधित नियमातील तरतूदींचा अवलंब करुन विहित प्रक्रियेद्वारे आवश्यक तेथे सर्व हितसंबंधितांना सुनावणीची संधी देऊन भोगवटादार सदरी संबंधित **"वक्फ संस्थेचे नाव"** आणि इतर हक्क **सदरी "वक्फ प्रतिबंधित सत्ता प्रकार"** अशी नोंद घेण्याकामी कायद्यातील तरतूदीनुसार सत्वर कार्यवाही करण्यात यावी.

(४) नागरी भागातील वक्फ मिळकतीच्या बाबतीतही संबंधित वक्फ मालमत्तेच्या अधिकार अभिलेख्यांमध्ये (म्हणजेच प्रॉपर्टी कार्ड मध्ये) भोगवटादार सदरी संबंधित **"वक्फ संस्थेचे**

नाव" आणि इतर हक्क सदरी **"वक्फ प्रतिबंधित सत्ता प्रकार"** अशी नोंद घेण्याकामी कायद्यातील तरतूदीनुसार सत्वर कार्यवाही करण्यात यावी. सदरची कार्यवाही जिल्हा अधिक्षक, भूमि अभिलेख यांनी सत्वर करावी.

०२. सर्व जिल्हाधिकारी व क्षेत्रीय महसूली प्राधिकारी तसेच जिल्हा अधिक्षक, भूमि अभिलेख यांनी या निर्देशांची तात्काळ अंमलबजावणी करावी. तथापि, या शासन निर्णयाची अंमलबजावणी करीत असताना भोगवटादार वर्ग-२ या धारणाधिकारावर किंवा भाडेपट्टयावर शासनाकडून देण्यात आलेल्या मूळ शासकीय जमिनी वक्फ करण्यात आल्याचे आढळून आल्यास, या शासन निर्णयानुसार कार्यवाही न करता अशा प्रकरणी शासनाचे मार्गदर्शन घेण्यात यावे.

०३. सर्व विभागीय आयुक्त आणि जिल्हाधिकारी यांनी त्यांच्याशी संबंधित जिल्ह्यातील, वक्फ मालमत्तांच्या जमिनीच्या संदर्भात अधिकार अभिलेखात वरीलप्रमाणे नोंदी घेण्यासाठी प्रलंबित असलेल्या प्रकरणांचा मासिक बैठकीमध्ये आढावा घ्यावा.

०४. सदर शासन निर्णय हा अल्पसंख्यांक विकास विभागाच्या विनंती व सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१६०४१२१५४५०४३२१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Manu Kumar Srivastava

Digitally signed by Manu Kumar Srivastava
DN: c=IN, o=All India Services, ou=Principal Secretary, postalCode=400032, st=Maharashtra, cn=Manu Kumar Srivastava
Date: 2016.04.13 11:49:51 +05'30'

मनुकुमार श्रीवास्तव
प्रधान सचिव, महसूल व वन विभाग

प्रत,
१) मा.राज्यपाल, महाराष्ट्र राज्य यांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई,
२) मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मुख्यमंत्री सचिवालय, मंत्रालय, मुंबई,
३) मा.मंत्री (महसूल व अल्पसंख्यांक विकास व वक्फ) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय,मुंबई-३२,
४) मा. राज्यमंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय,मुंबई-३२,
५) मा.राज्यमंत्री (अल्पसंख्यांक विकास व वक्फ) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय,मुंबई-३२,
६) मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय,मुंबई-३२,

७) प्रधान सचिव, अल्पसंख्यांक विकास विभाग, मंत्रालय, मुंबई-३२,
८) प्रधान सचिव, विधानमंडळ सचिवालय, विधानभवन, मुंबई,
९) प्रधान सचिव (महसूल) यांचे वि.का.अ./स्वीय सहायक, मंत्रालय,मुंबई-३२,
१०) सर्व विभागीय आयुक्त,
११) जमाबंदी आयुक्त व संचालक, भूमी अभिलेख, महाराष्ट्र राज्य, पुणे,
१२) सर्व जिल्हाधिकारी /अपर जिल्हाधिकारी,
१३) सर्व उप विभागीय अधिकारी (प्रांत अधिकारी)
१४) सर्व जिल्हा अधिक्षक, भूमी अभिलेख,
१५) मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, औरंगाबाद,
१६) पिठासीन अधिकारी, वक्फ न्यायाधिकरण, मुंबई/नागपूर
१७) सर्व तहसिलदार,
१८) सर्व तालुका निरिक्षक, भूमी अभिलेख,
१९) महालेखापाल, लेखा व अनुज्ञेयता/लेखापरिक्षा, महाराष्ट्र राज्य, (१) मुंबई,
२०) महालेखापाल, लेखा व अनुज्ञेयता/लेखापरिक्षा, महाराष्ट्र राज्य (२) नागपूर,
२१) सर्व सहसचिव/उपसचिव, महसूल व वन विभाग, मंत्रालय,मुंबई-३२,
२२) "ज" समूहातील सर्व कार्यासन, महसूल व वन विभाग, मंत्रालय,मुंबई-३२,
२३) माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय,मुंबई-३२,
२४) अवर सचिव (ल-१), महसूल व वन विभाग, मंत्रालय,मुंबई-३२,
२५) निवडनस्ती, कार्यासन-ज-१ अ, महसूल व वन विभाग,मंत्रालय,मुंबई-३२.

************